# MARATHI

## Standard V

*TEACHER'S GUIDE*

**Part I**

**भाग पहिला**

मराठी इयत्ता पाचवी

शिक्षकांसाठी

हस्तपुस्तिका

MAHATMA GANDHI INSTITUTE
In collaboration with
MINISTRY OF EDUCATION & HUMAN RESOURCES,
TERTIARY EDUCATION AND SCIENTIFIC
RESEARCH
Republic of Mauritius
2016

# निवेदन

शिक्षक मित्रहो,

आपली मुले सभ्य समाजाचा घटक बनावी, थोर व्हावी, त्यांनी त्यांचे आणि आपले नाव उज्ज्वल करावे, यासाठी चिकाटीने त्यांच्या विकासाचा पाया मजबूत करावा लागेल.

लहान मुलेच पुढे मोठे होऊन देशाचे आणि समाजाचे नेतृत्व व संचालन करीत असतात. आजची बालके हीच भावी काळाचे राष्ट्रनिर्माते आहेत. समाजाची व राष्ट्राची उत्कृष्ट नवनिर्मिती हे उत्कृष्ट नागरिकांवरच अवलंबून असते. मानवाची जडणघडण मुख्यत्वे त्याच्या बालवयात खऱ्या अर्थाने होत असते.

आपल्या मुलांना चांगले संस्कार, चांगले शिक्षण मिळावे या हेतुने शिक्षण मंत्रालयाने मराठी पाठ्यक्रम निर्मिती समिती स्थापित केली. शासनाने प्राथमिक शाळेच्या मुलांसाठी मान्य केलेल्या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने तयार इयत्ता पाचवीची सुधारित आवृत्ती आपल्या हाती सुपुर्द करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

या सुधारित आवृत्तीमध्ये मुलांना मराठी शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी त्यांच्या कुवती व आवडीनुसार यथाशक्य वेगवेगळे व्यवसाय देण्यात आलेले आहेत. त्याच बरोबर MGI ने

तयार केलेल्या सी.डी मधील काही बालगीते लावलेली आहेत. सी.डी सोबत असलेल्या पुस्तिकेमधील बालगीतांची प्रत मुलांना अवश्य द्यावी. आधुनिक तंत्राचा आधार घेऊन मुलांपर्यंत ही गीते अवश्य पोहोचवावीत.

शिक्षक मुले व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील व योग्य पद्धतीने त्याचा वापर करून ज्ञानदान करतील अशी आम्हाला पूर्ण खात्री आहे.

धन्यवाद.

मराठी पाठ्यपुस्तक समिती

डॉ. बी. आबा

२०१६

# *Panel Members*

| | | |
|---|---|---|
| **Dr. B. Abba** | - | *Senior Lecturer* |
| *( Coordinator )* | | *Mahatma Gandhi Institute* |
| **Mrs. P. Gopalla** | - | *Senior Supervisor* |
| | | *Ministry of Edu , H. R & T.E )* |
| **Mrs. R. Babajee** | - | *Ag. Assistant Supervisor* |
| | | *(Mins of Edu , H. R & T.E )* |
| **Mr. R. Gunnoo** | - | *T/ST Mins of Edu , H. R & T.E )* |
| **Mrs. S. K. Bungaree** | - | *T/ST (Mins of Edu , H. R & T.E )* |
| **Mrs. N.H. Luximon** | - | *Educator MGSS* |
| **Mrs. P. Isram** | - | *Educator MGISS* |

Acknowledgements and Coordination
MAHATMA GANDHI INSTITUTE
MAURITIUS INSTITUTE OF EDUCATION

## PRODUCTION

***Word Processing: Mr. R. Gunnoo***
***Layout: Mr. S. Meyakhan***

# अनुक्रमणिका

## पहिला भाग — पृष्ठ


| पहिला भाग | पृष्ठ |
|---|---|
| १. आपले सण | १ |
| २. पाण्याचे महत्त्व | ४ |
| ३. स्वातंत्र मॉरिशस | ७ |
| ४. बाल शिवाजी | १० |
| ५. सुपर मार्केट | १३ |
| ६. संस्कार | १६ |

**भाग दुसरा** **पृष्ठ**


७. अपंग

८. मिठागर

९. निसर्गाची देणगी

कथा

विनोद

शब्दकोडे

१०. निसर्गाची देणगी

११. स्वास्थ्य आणि संरक्षण

१२. जाहिरात

१३. नाताळ

## धडा १ ला: आपले सण

**प्रास्ताविक:** आपल्या देशात अनेक धर्माचे लोक आहेत. त्यामुळे येथे अनेक सण साजरे केले जातात. सण हा मुलांच्या आवडीचा विषय आहे. सण म्हटला की मुले आतुरतेने वाट बघत असतात. कारण सणाच्या दिवशी त्यांची मोठी मजा असते. मुले सणांचा पुरेपूर आनंद घेत असतात. ' आपले सण ' या पाठाद्वारे मुलांना अनेक सणांविषयी माहिति देता येईल.

**पूर्वानुभव:** मुलांना सणांची नावे माहीत आहेत. जसे महाशिवरात्री, होळी, इत्यादी त्यांना आपल्याकडील सणांची थोडीफार कल्पना आहे. ती सणांमध्ये सहभागी झालेली आहेत. त्यांनी बऱ्याच वेळा सणांचा आनंद घेतलेला आहे.

**साध्य:** हा पाठ शिकवल्यावर:

मुलांना अनेक सणांची नावे माहीत होतील.

त्यांच्या ज्ञानात सणांविषयीची भर पडेल.

त्यांना देवी देवतांची नावे माहीत होतील.

ती नवीन शब्दसंग्रह आत्मसात करतील.

पूर्वतयारी: निरनिराळ्या देवीदेवतांची चित्रे गोळा करावीत.

आपल्याकडील सणांविषयीची माहिती मिळवून ठेवावी.

आपल्या सणांशी निगडित असलेल्या कथा मिळवून वाचाव्यात.

आपल्या सणांविषयी एखादी कविता किंवा गाणे मिळवून ठेवावे.

अध्यापन सूचना: मुलांचे लक्ष वेधून घेतील अशा आपल्या सणां-विषयीची दोन चित्रे दाखवून त्यांवरून मुलांना प्रश्न विचारावेत. विचारलेल्या प्रश्नांची योग्य अशी उत्तरे मिळाल्यावर हेतुकथनाकडे वळावे. पाठ घेत असता पाठात आलेल्या सणांची नावे फळ्यावर लिहून काढावीत. पुढे प्रत्येक सणाविषयी मुलांच्या कुवतीला अनुसरून योग्य अशी माहिती द्यावी. पाठात आलेल्या सणांविषयी बोलताना ते सण कसे शिस्तीने व योग्य रीतीने साजरे करावे या बद्दलचे ज्ञान मुलांना द्यावे. प्रत्येक सणाशी निगडित असलेल्या देवतेच्या नावाचा उल्लेख

पाठात येऊ द्यावा. वर्गात आळीपाळीने मुलांचे स्पष्टोच्चारित वाचन घ्यावे. त्यानंतर पाठावर आधारित दिलेला व्यवसाय करावयास मुलांना मार्गदर्शन करावे.

अन्य उपक्रम: प्रत्येक महिन्यात येणाऱ्या आपल्या सणांच्या नावांची सूची तयार करून मुलांना द्यावी.

उदा. चैत्र - गुढीपाडवा, राम नवमी व हनुमानजयंती. मुलांना देवादेवतांना प्रिय असलेल्या वस्तूंची नावे लिहून त्यांची यादी तयार करावयास लावावी. वर्गात मुलांना आपापल्या आवडत्या सणाविषयी बोलावयास प्रोत्साहित करावे.

विविध धर्मातील लोक आपल्या विशिष्ट सणांच्या दिवशी कोणता पोषाख वापरतात या विषयी माहिती लिहून त्यांची यादी तयार करावयास लावावी.

## धडा २ रा: पाण्याचे महत्त्व

**प्रास्ताविक:** पाऊस पडतो म्हणून नद्या आणि तळ्यात पाणी उपलब्ध असते. हे पाणी भाज्या अथवा शेतांच्या सिंचनासाठी आणि माणसांच्या जीवनातील अनेक घरगुटी कार्यांच्या उपयोगासाठी वापरले जाते. देवाने आपल्याला पाणी ही अमोल देणगी दिली आहे. पाण्याचा सदुपयोग करून माणसाला खूप लाभ झाला आहे. ‘ पाण्याचे महत्त्व ’ या पाठात याचा उल्लेख करण्यात आला आहे.

**पूर्वानुभव:** बहुतेक पिण्याची पेये पाण्यापासून तयार होतात हे मुलांना माहीत आहे. भाज्या, कपडे व इतर गोष्टी धुण्यासाठी पाणी लागते हेही त्यांना माहीत आहे. अंगणात सुंदर फुलझाडे वाढवण्यासाठी पाण्याची गरज असते याची त्यांना कल्पना आहे.

**साध्य:** हा पाठ शिकवल्यावर:

मुलांना पाण्याचे महत्त्व कळेल.

अनेक प्रकारे पाण्याचे वापर करण्यात येतो हे मुलांना कळेल.

मुले पाण्याचा योग्य प्रकारे उपयोग करायला शिकतील.

पाण्याशी निगडित असलेला शब्दसंग्रह मुलांना अवगत होईल.

पूर्वतयारी: नळाचे पाणी साफ असते. हे पाणी कसे व कोठून शुद्ध होऊन आपल्या घरी येते हे सांगण्याची तयारी करावी.

अध्यापन: पुस्तकातील चित्रावर चर्चा करून पाठाची प्रस्तावना करावी. पाठाचे आदर्श वाचन करावे. मुलांना उतारा समजावून सांगावा. मग मुलांना आळीपाळीने पाठाचे वाचन करावयास सांगावे. पाठावरील मुलांच्या शंकांचे निरसन करावे. नंतर पाठावर आधारित दिलेले लेखी कार्य करावयास मुलांना योग्य ते मार्गदर्शन करावे.

अन्य उपक्रम: पाऊस अथवा पाण्यावर आधारित एखादी कविता किंवा एकादे गीत मुलांना शिकवावे.

पाण्याशी निगडित असलेला शब्द देऊन मुलांना त्याचे चित्र रेखाटायला सांगावे. जसे. नदीला पूर आलेले चित्र आणि पाऊस पडतानाचे चित्र इत्यादि.

पाण्याशी निगडित कात्रणे गोळा करून मुलांना शोधकार्य करायला लावणे.

‘पाऊस आला मोठा’ ही सी. डी मुलांना दाखववावी.

## धडा ३ रा: स्वतंत्र मॉरिशस

**प्रास्ताविक:** जागतिक नकाशावर आपला मॉरिशस देश एका ठिपक्याद्वारे दर्शविला गेला असला तरी जगात तो खूप प्रसिद्ध आहे. निसर्गरम्य मॉरिशसमधील मजा लुटण्यासाठी वर्षभर लाखो पर्यटक येत असतात. खूप वर्षांपूर्वीपासून आपल्या मॉरिशसला 'हिंदमहासागराचा तारा ' ही उपाधी देण्यात आलेली आहे.

**पूर्वानुभव:** मुलांना मॉरिशसविषयी थोडीफार माहिती आहे. त्यांना हिंदमहासागरातील इतर काही बेटांची नावे पण माहीत आहेत. प्रथम या बेटावर डॅच लोक राहायला आले होते. नंतर फ्रेंच लोकांनी राज्य केले. त्यानंतर इंग्रजांनी हा देश आपल्या ताब्यात घेतला.

**साध्य:** हा पाठ शिकवल्यावर:

मुलांना मॉरिशसच्या इतिहासाची थोडीफार कल्पना होईल. मुलांना स्वतंत्र मॉरिशसच्या व वर्तमानकालीन स्थितीची कल्पना येईल.

मुलांना आपल्या राष्ट्रध्वजाचे महत्त्व कळेल.

पूर्वतयारी :नऊ जिल्ह्यांचा मॉरिशसचा आकर्षक असा रंगीत नकाशा मिळवावा.

आपल्या देशातील काही निसर्गरम्य स्थळांची आकर्षक चित्रे गोळा करावीत.

स्वातंत्र्य पूर्वीच्या काळातील मॉरिशसविषयीची थोडीफार माहिती मिळवावी.

आपल्या देशाविषयीची एखादी कविता किंवा गीत मिळवावे.

अध्यापन मॉरिशसचा आकर्षक नकाशा दाखवून पाठाची प्रस्तावना करावी. पाठ परिचय करून देत असता विचारलेल्या प्रश्नांची मुलांकडून पूर्ण वाक्यांत उत्तरे मिळवल्यावर हेतुकथन करावे.

स्वातंत्र्यापूर्वीच्या मॉरिशसबद्दल मुलांना थोडीफार कल्पना देऊन स्वातंत्र्योत्तर काळात मॉरिशसने केलेल्या वाटचालीची माहिती द्यावी.

अध्यापनाच्या वेळेस मुलांनाही आपल्या देशाविषयी बोलावयाची संधी द्यावी. आपल्या देशात शिक्षण,

कृषी व पर्यटन इत्यादी क्षेत्रांत झालेली प्रगती मुलांच्या लक्षात आणून द्यावी.

पाठासोबत अध्यापनाच्या पूर्वतयारीत सुचवल्याप्रमाणे मिळवलेली कविता अथवा देशभक्ती गीत मुलांना शिकवावे.

शेवटी पाठावरून मुलांचे स्पष्टोच्चारित वाचन घेऊन पाठावर आधारित दिलेला व्यवसाय करावयास त्यांना मार्गदर्शन करावे.

अन्य उपक्रम: मॉरिशस देशावर आधीरित कविता अथवा गीत मुलांना शिकवावे.

आपल्या देशाच्या नकाशाचे चित्र रेखाटायला सांगावे. त्यात आपले नऊ जिल्हे जोडावयास लावावे.

पाहिजे असल्यास त्या नऊ जिल्ह्यांना रंग लावावयास उत्तेजित करावे.

लिखित कार्य. मुलांना आपले नऊ जिल्हे, स्वतःचा पत्ता लिहावयास मदत करावी.

## धडा ४ था: बाल शिवाजी

**प्रास्ताविक:** शिवाजी महाराज हा थोर पुरूष सर्वांच्या ओळखीचा आहे. अनेक ठिकाणी आपल्याला त्यांची भव्य मूर्ती पाहता येते. त्यांचे नावही अनेक औपचारिक ठिकाणी आढळते. शिवाजी महाराजांसारखे शूर आणि पराक्रमी दुसरे कोणीच नाही.

**पूर्वानुभव:** दर वर्षी मॉरिशसमध्ये मे महिन्याच्या पहिल्या दिवशी राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्र दिवस आणि शिवाजी जयंती साजरी केली जाते. त्यावेळेस शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित अनेक कार्यक्रम सादर केले जातात, आणि मुलांनी ते पाहिले असेलच.

**साध्य:** हा पाठ शिकवल्यावर:

मुलांना बाल शिवाजीच्या जीवनाबद्दल योग्य ती माहिती मिळणार.

त्यांना शिवाजी महाराजांच्या बालपणाविषयी ज्ञान मिळेल.

शिवाजी महाराज किती शूर व पराक्रमी होते याबद्दल माहिती मिळेल.

पूर्वतयारी: 'शिवाजी महाराज' यांची विविध चित्रे गोळा करून ठेवावी.

शिवाजी महाराजांचे बालपण, शिवनेरी किल्ला, रायगड किल्ला, शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक यांबद्दल माहिती गोळा करावी.

अध्यापन: आपल्या पाठ्यविषयास निगडित असलेली आकर्षक चित्रे दाखवून त्यांवरून मुलांना प्रश्न विचारावेत. विचारलेल्या प्रश्नांना समर्पक अशी उत्तरे मुलांकडून मिळाल्यावर आपले हेतुकथन करावे. नंतर सावकाशपणे पाठाचे आदर्शवाचन करावे. पाठ समजून देत असता त्यात आलेल्या नवीन शब्दांची ओळख करून फळ्यावर लिहून काढावेत.

पाठावरून मुलांना योग्य ती माहिती दिल्यावर मुलांचे स्पष्टोच्चारित वाचन घ्यावे.

शेवटी पाठावर आधारित दिलेला व्यवसाय करावयास मुलांना मार्गदर्शन करावे. अन्य

व्यवसायाची जरूरी भासल्यास पाठाला अनुसरून तो तयार करून द्यावा.

अन्य उपक्रम: किल्ला, ढाल, तलवार यांची चित्रे मुलांना काढायला लावावी.

## धडा ५ वा: सुपर मार्केट

प्रास्ताविक: आज बहुतेक माणसे खाद्यपदार्थ आणि घरगुती सामान विकत घेण्यासाठी सुपरमार्केटमध्ये जातात. कारण तेथे अनेक पदार्थ व सामान कमी दरात मिळतात. याशिवाय सुपरमार्केटमध्ये आपल्या आवडीचे पदार्थ व सामाने स्वतःला निवडून घेता येतात. गावातील दुकानांच्या मानाने सुपरमार्केटमध्ये खरेदी केल्याने काही रूपयांचा नफा पण होतो. ‘ सुपरमार्केट ’ या पाठात विषयाला धरून एका प्रसंगाचे वर्णन करण्यात आले आहे.

पूर्वानुभव: सुपरमार्केट हे नाव रेडिओ किंवा टि.व्हीद्वारे मुलांच्या कानावर पडलेच आहे. वृत्तपत्रांतून मुलांनी सुपरमार्केटच्या अनेक जाहिराती पाहिल्या आहेत.

साध्य: हा पाठ शिकवल्यावर:

मुलांना विक्री - खरेदी ह्यांतले तंत्र अवगत होईल.

मुले खरेदी करण्यापूर्वी पदार्थांची किंमत किंवा व समाप्तीची तारीख तपासायला शिकतील.

मुले पैशांचा योग्य प्रकारे वापर करायला शिकतील. मुलांना या विषयाशी निगडित नवा शब्दसंग्रह अवगत होईल.

पूर्वतयारी: मुलांना दाखविण्यासाठी वृत्तपत्रातून कोणा एका सुपरमार्केटची जाहिरात मिळवून ठेवावी. त्यातल्या पदार्थांच्या किंमतीबद्दल चर्चा करण्याची तयारी करावी. पदार्थांच्या गुणधर्माबद्दल किंवा किंमतींबद्दल तुलनात्मक चर्चा करण्याची तयारी करावी.

अध्यापन: सूचना: पुस्तकातील चित्रावर चर्चा करून पाठाची प्रस्तावना करावी. उताऱ्याचे वाचन करावे. मुलांना तो समजावून सांगावा.

' जाहिरात ' या शब्दावर भर घालून माणसांवर तिच्या परिणामाबद्दल मुलांना थोडक्यात समजावून सांगावे. नंतर आळीपाळीने मुलांना वाचायला लावावे. वाचन करताना मुलांच्या उच्चाराकडे लक्ष द्यावे.

जसे. स्कीप पावडर, बिस्किटे, ओमो इत्यादि...

त्यानंतर पाठावर आधारित दिलेली लेखी कार्ये करायला मुलांना योग्य ते मार्गदर्शन करावे.

अन्य उपक्रम: मुलांना काही खाद्य पदार्थांची नावे सांगायला उत्तेजित करावे.

मुलांना वृत्तपत्रातून घरगुती सामानांची कात्रणे गोळा करावयास सांगावे.

मुलांना आपल्या आवडीच्या खाद्य पदार्थांची एक यादी तयार करावयास सांगावे.

खाद्य पदार्थांच्या समाप्तीची तारीख कशी तपासतो वर्गात कृती करून मुलांना दाखवावे.

मुलांना काही खाद्य पदार्थांच्या किंमतींची एक यादी तयार करावयास सांगावे.

## धडा ६ वा: संस्कार

प्रास्ताविक: सामान्य माणसाला धर्माची भीती वाटत असे. माणूस भीती असल्याशिवाय शिस्तीचे पालन करीत नाही. हा स्वभाव आहे. एके काळी घरातील सर्वात वयस्क मंडळी जे काय निर्णय घेत असत त्याविरूद्ध बोलणे कोणालाही धाडस होत नसे.

सकाळी सूर्योदयाअगोदर जागे होणे, पूजा - अर्चा, शिस्त आदि त्या काळी वडीलधारी जे काय सांगतील ते ब्रम्हवाक्य समजले जाई.

हळूहळू काळ बदललेला आहे. धर्माची भीती राहिली नाही. लोक काय बोलतील याची पर्वा मुळीच नाही. आपल्या घरी आपण स्वतः मालक आहोत. कोणाशी आमचे लेणेदेणे नाही. ह्याप्रकारच्या आचरणांनी हळूहळू एक पिढी बिघडलेली आहे. नव्या पिढीला सावध करण्यासाठी ‘ संस्कार ’ ह्या पाठात यशना आपल्या सुसंस्कृत नि सदाचारी गुणांनी आपल्याला मार्गदर्शन करीत आहे.

पूर्वानुभव: “ अरे ऊठ ! बघ किती वाजले ? ”; “ तुझी खोली तू स्वतः आवर ”; “ बघ, तू माझ्याशी खोटे बोलू नकोस ”; “ टि.व्ही बंद कर ”; ‘‘ अरे आळशा ! दिवसभर लापटॉपवर खेळत राहशील काय ? ’’;
‘‘ अग ! आई राागवेल ’’. असे बरेच शब्द आम्ही ऐकत आलो. कधीकधी मुलांना वाटत की आपले आईवडील आपल्यावर प्रेम करत नसतात. मात्र तीच मुले शाळेत शिस्तीने वागत असतात. गुरुजी-बाईंचे म्हणणे ते टाळत नसतात. गुरुजी-बाईंचे प्रत्येक शब्द त्या लहान मुलांच्या कोमल मनावर प्रभाव टाकतो.

साध्य: हा पाठ शिकवल्यावर:
यशना प्रमाणेच मुलांना वागण्यास स्फूर्ती मिळेल.
आदर्श मुले नेहमी यशस्वी होतील ह्याची जाणीव होईल.
मुले वक्तशीर, शिष्टाचार, सत्यवक्ता, सदाचरण आदि गुण आत्मसात करतील.

मुलांना या विषयाशी निगडित नवा शब्दसंग्रह अवगत होईल.

पूर्वतयारी: ‘ संस्कार ’ ह्या पाठात ‘ यशना ’ हे पात्र असून प्रत्येक मुलाला ही भुमिका निभावयास लागेल. हे लक्षात घेऊन सुसंस्काराचे काही मुद्दे नोंद करावे.
जसे. चांगली मुले पहाटे लवकर उठतात.
गुणी मुले वडीलधाऱ्यांचे नेहमी ऐकतात.
सदाचारी मुले खोटे बोलत नसतात.
चोऱ्या न करणे, दुसऱ्याच्या मदतीस येणे इत्यादि शिकवण मुलांना अवश्य द्यावे

अध्यापन: सूचना: पुस्तकातील चित्रावर चर्चा करून पाठाची प्रस्तावना करावी. उताऱ्याचे वाचन करावे. मुलांना तो समजावून सांगावा.

‘ संस्कार ’ या शब्दावर भर घालून आमच्या जीवनात याचे महत्त्व काय याबद्दल मुलांना थोडक्यात समजावून सांगावे. त्यांना अनेक साधीसुधी उदाहरणे देणे. नंतर आळीपाळीने मुलांना वाचायला लावावे. वाचन करताना मुलांच्या

उच्चाराकडे लक्ष द्यावे. त्यानंतर पाठावर आधारित दिलेली लेखी कार्ये करायला मुलांना योग्य ते मार्गदर्शन करावे.

अन्य उपक्रम: नाटकीकरण प्रणालीचा उपयोग करून एका चांगल्या संदर्भाचा शोध घेऊन मुलांना चांगली कृती करायला दाखवणे.

उदाहरण. वयस्क किंवा अपंग माणसांना मदत करणे, कोणाचे पैसे हरवले तर त्याला मदत करायची, दुःखी वा दुबळ्यांची सेवा कशी करायची याविषयी काही संवाद तयार करून नाटिका सादर करायला मुलांचे मार्गदर्शन करावे.